# कापूस उत्पादकता वाढ प्रकल्प हे 'अकोला मॉडेल'च

## केंद्रीय वस्त्रोद्योगमंत्री गिरिराज सिंह यांची माहिती

ॲग्रोवन वृत्तसेवा


गिरिराज सिंह

नागपूर : सघन व अति सघन कापूस लागवडीच्या माध्यमातून कापूस उत्पादकता वाढीसाठी अकोल्यातून सुरू झालेल्या प्रयोगांना देशपातळीवर मान्यता मिळणार असून, या पॅटर्नची ओळख 'अकोला मॉडेल' म्हणून होईल, असा विश्वास केंद्रीय वस्त्र उद्योगमंत्री गिरिराज सिंह यांनी व्यक्त केला. प्रयोगशील शेतकरी दिलीप ठाकरे यांनी रविवारी (ता. १८) नागपूर येथे केंद्रीय मंत्र्यांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

गिरिराज सिंह म्हणाले की, जगातील इतर कापूस उत्पादक देशांमध्ये प्रतिहेक्टर २ हजार ते २ हजार २०० किलो रुई उत्पादन होते. त्या तुलनेत भारताची उत्पादकता कमी असून, ती वाढविण्यासाठी आवश्यक सर्व धोरणात्मक उपाय केंद्र सरकार राबवेल. देशातील कापूस उत्पादकता वाढीमध्ये हाय डेन्सिटी प्लांटिंग सिस्टीमच्या माध्यमातून अकोल्याने महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे या यशस्वी पद्धतीला 'अकोला मॉडेल' म्हणून देशभर ओळख दिली जाईल. कापूस उत्पादनात देश आत्मनिर्भर व्हावा, यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या वेळी दिलीप ठाकरे यांनी भारतीय कापूस पणन महामंडळाने (सीसीआय) बाजारात केलेल्या हस्तक्षेपामुळे कापसाचे दर टिकून राहिल्याची माहिती दिली. तसेच खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता अनुभवास आल्याचेही त्यांनी सांगितले. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संस्था (सिरकॉट) सध्या कापूस प्रक्रियेत आणि काही संयंत्रावर काम करीत आहे या संस्थेच्या माध्यमातून देखील कापूस उत्पादकांना दिलासा देण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती त्यांनी सिंह यांना दिली.

### कापूस संशोधन संस्थेच्या कामगिरीवर नाराजी

केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे तत्कालीन संचालक डॉ. वाय. जी. प्रसाद यांच्या कार्यकाळात 'एचडीपीएस' प्रकल्प प्रभावीपणे राबविला गेला आणि संशोधनालाही चालना मिळाली होती. मात्र संचालक बदलल्यानंतर कापूस उत्पादकता वाढ प्रकल्पाला खीळ बसल्याचा आरोप श्री. ठाकरे यांनी केला. सध्या संशोधनात्मक स्तरावर 'सीआयसीआर'कडून ठोस उपलब्धी दिसत नसल्याची नाराजी व्यक्त करत, या बाबत संबंधितांना आवश्यक सूचना देण्याची मागणी त्यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे केली.

### यांत्रिकीकरणावर भर देण्याची मागणी

'एचडीपीएस' तंत्रज्ञानामुळे कापसाची उत्पादकता वाढणार असली, तरी वेचणीसाठी मजुरांची कमतरता आणि वाढता खर्च ही मोठी अडचण आहे. त्यामुळे कापूस लागवडीपासून वेचणीपर्यंत विविध टप्प्यांवर उपयुक्त ठरेल असे यांत्रिकीकरण शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा, अशी मागणी ठाकरे यांनी केली. सध्या काही कंपन्यांची वेचणी यंत्रे उपलब्ध असली, तरी त्यासाठी आवश्यक असलेले पानगळ करणारे रसायन (डिफोलियंट) अद्याप उपलब्ध नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. या सर्व बाबींवर एकत्रितपणे धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**Sakad Agroone 21 January 2026**